# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/07/2023 (सोमवार) सकाळ


---

## अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक ०३/०७/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे सावनेर उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना गोपनिय मुखबिरकडुन माहिती मिळाली की, पो.स्टे. केळवद हद्दीत मौजा मंगसा गावाजवळ एक काळया रंगाची बजाज पल्सरने एक पांढऱ्या रंगाचे टी शर्ट घातलेला इसम आपल्याजवळ देशी कट्टा घेवून फिरत आहे. अशा माहितीवरून पंच व स्टाफ सह जाऊन त्याचा शोध घेऊन सदर इसमास त्याला ताब्यात घेऊन पंचा समक्ष त्यांची झडती घेतली असता त्याचे अंगझडतीत एक लोखंडी देशी कट्टा एक जिवंत काडतुस सह मिळुन आला. यातील **आरोपी नामे— विक्की देविदास चंद्रिकापुरे, वय ३५ वर्ष, रा. कुचक मोहल्ला पिपळा डाग बंगला, ता. सावनेर, जि. नागपूर** हा आपले जवळ देशी कट्टा बाळगून अप्रीय घटना करण्याचे उद्देशाने मौजा मंगसा गावाजवळ फिरतांना मिळुन आल्याने आरोपीस पकडले असता त्याला ताब्यात घेऊन पंचा समक्ष त्यांची झडती घेतली असता त्याचे अंगझडतीत १) एक लोखंडी देशी कट्टा किंमती अंदाजे २०,०००/— रुपये २) एक जिवंत काडतुस किंमती अंदाजे किंमत २०००/— रुपये सह मिळुन आला. ३) एक दुचाकी वाहन क्र. MH -४० BM ०२५२ किंमती अंदाजे ८०,०००/— रुपये असा एकूण किंमती अंदाजे १,०२,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर हत्यारा बाबत आरोपीला परवाना विचारला असता त्याच्या जवळ कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे मिळुन आले नाही. आरोपीला जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे केळवद यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार राजेंद्र रेवतकर, पोलीस नायक आशिष मुंगळे, किशोर वानखेडे, विरेंद्र नरड, उमेश फुलबेल, प्रमोद भोयर, चालक पोलीस हवालदार अमोल कुथे यांचे पथकाने केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर